सं. फौ. प्र. क्र. – ४१४/२०२२
सरकार वि. भुषण
**निशाणी क्र. ५४**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा शपथेवर जबाब**

**सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | – | कुसुम गजानन मेटांगे, |
| **वय** | – | ३५ वर्ष, धंदा – मजुरी, |
| **राहणार** | – | संत कबीर नगर, लक्ष्मी नगर जवळ, अमरावती |

---

**सरकारतर्फे सरतपास श्री. एम. ए. यावले, सरकारी वकीलांतर्फे**

१. फिर्यादी माझी बहीन आहे तिचे लग्न भुषण जावरकर सोबत झाले. आरोपी भुषण हा जसापुर, ता.– चांदुर बाजार जि.– अमरावती येथे राहतो. दिनांक २०/०२/२०२० रोजी भुषण सोबत तिचे लग्न झाले होते. माझी बहीन व आरोपीची भेट फेसबुक वर झाली होती. त्यानंतर त्यांनी लग्न केले. मी सर्व आरोपींना ओळखते. आज न्यायालयात भुषण व प्रियंका हजर आहे. लग्नानंतर व्यवस्थीत राहीली. त्यानंतर माझ्या बहीनीचे फोन यायला लागले की, आरोपी भुषण हा दारु पितो, मारहान करतो जोराने बोललो तर तोंड दाबतो. मी प्रेमात लग्न करुन फसलो असा म्हणतो. आई वडीलांकडुन काहीही भेटले नाही. माझ्या आई वडीलांनी पन्नास हजार रुपये लग्ना करीता दिले व बहीनीला कानातले सोन्याचे दागीने करुन दिले होते.

२. गणपती च्या कालावधी ती आमच्या कडे आली. माझ्या वडीलांनी पैसे दिले नाही म्हणुन त्याने तीला आमच्या कडे आणुन दिले होते. पोलीसांनी माझी चौकशी केली होती तसेच बयान नोंदविले होते.

**उलटतपास आरोपी तर्फे श्री. एस. बी. उमेकर विधीज्ञ**

३. माधुरी कुठे राहते ते मला माहीत नाही. प्रेमात लग्न करुन फसलो,दारु पिवुन मारहान करतो, जोराने बोललो तर तोंड दाबतो असे पोलीसांनी सांगीतले होते. माझ्या बयानात हे का नमुद केले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. लग्नाकरीता पन्नास हजार रुपये दिले हे मी बयान देतेवेळी पोलीसांना सांगीतले होते. हे माझ्या बयानात का नमुद केले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. गणपतीच्या

कालावधीत ती आमच्या कडे आली, माझ्या वडीलांनी पैसे दिले नाही म्हणुन त्याने तीला आमच्या कडे आणुन दिले होते हे मी पोलीसांना सांगीतले होते परंतु ते बयानात का नोंदविले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. माझ्या बहीनीचे लग्न झाल्यानंतर ती गरोधर राहीली. डॉक्टरांनी तिला बेडरेस्ट सांगीतले होते म्हणुन ती जसापुर येथे राहत होती. माझ्या बहीनीला जसापुर येथुन डॉ. विधळे यांचे कडे नेले आणि त्यानंतर डॉ. पंजाबराव मेडीकल हॉस्पीटल, अमरावती येथे नेले होते. प्रसुती झाल्यानंतर माझी बहीन माहेरी आली होती. हे म्हणणे खरे नाही की, भुषण हा अमरावती येथे खाजगी नोकरी करीत होती त्यामुळे माझी बहीन अमरावती येथे गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, भुषण आजारी पडला होता त्यामुळे माझी बहीन त्याच्या उपचारा करीता मुंबईला गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मुंबई वरुन आल्यानंतर भुषनला कोणतेही काम करता येत नव्हते. त्यावेळी माझी बहीन भुषण कडेच होती. भुषणच्या पायाचे ऑपरेशन अकोला येथे झाले होते. त्यावेळी माझी बहीन भुषण सोबत होती. अकोल्यातुन सुटी झाल्यानंतर ते अमरावती येथे राहत होते. भुषण चे ऑपरेशन झाल्यानंतर माझी बहीन किती दिवस नांदली हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ऑपरेशन झाल्याने भुषण कडुन कोणतेही काम होत नव्हते म्हणुन माझी बहीन नातेवाईकांकडे निघुन गेली. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर ती माहेरी राहु लागली. माधुरी ने दुसरा विवाह केला असुन ती पुसदा येथे राहत असल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी भुषनने मी सरतपासात सांगीतल्याप्रमाणे कोणताही त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, भुषनला त्रास देण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास – पुर्ण**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

श्रवणोत्तर स्विकृत

THAKARE ISHWAR JAMSING

Digitally signed by THAKARE ISHWAR JAMSING
Location: CJJD & JMFC, WARUD
Date: 2025.07.16 16:04:14 +0530

**(आय. जे. ठाकरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १,वरुड.

दिनांक : १६/०७/२०२५